# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

**(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक 2007/(322/07)विशि-4 महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम 1994(1994 चा महा.35) च्या कलम ३ च्या पोटकलम(2) अन्वये दिनांक 27 सप्टेंबर, 2011 रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 (सन 2017 चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक 6) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)**

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली 442605

दुरध्वनी क्र. 07132-223117 email:-establishment.section@unigug.ac.in


जा.क्र. गो.वि./आस्था./3608/२०२४ दि. ०५/११/२०२४

## *परिपत्रक*

**विषय:- आचारसंहिता पालनाबाबतचे निर्देश.**

संदर्भ:- मा. प्र-शिक्षण संचालक(उच्च शिक्षण) म. रा., पुणे यांचे परिपत्रक दिनांक ०५/११/२०२४

विद्यापीठातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी तसेच विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील मा. प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना कळविण्यात येते की, सध्या राज्यामध्ये महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. या आचारसंहितेमध्ये मा. निवडणूक आयोग यांचेकडून आचारसंहिता नियमाचे पालन करण्याबाबत विविध प्रकारचे निर्देश देण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने मा. प्र. शिक्षण संचालक(उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेव्दारे संदर्भांकित परिपत्रक दिनांक ०५/११/२०२४ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. कृपया सदर परिपत्रकाचे अवलोकन व्हावे व परिपत्रकात नमूद बाबीचे व आचारसंहिता नियमाचे उल्लंघन होणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तसेच विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालयांनी पात्र विद्यार्थी, विद्यार्थीनी यांना मतदान करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहित करावे.

**संलग्न:-** संदर्भांकित परिपत्रक.

(डॉ. अनिल हिरेखण)
**कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

***प्रतिलिपी माहितीकरीता सादर:-***

1. *मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.*
2. *मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.*
3. *मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.*
4. *सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना कळविण्यात येते की, आपले अधिनस्त असलेल्या शिक्षक, अधिकारी व कर्मचारी वर्गास परिपत्रक निदर्शनास आणुन द्यावा.*
5. *सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावा.*

*E:\Letters\Circular 199*

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी,शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६
Web : www.dhepune.gov.in E-mail:vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९

क्रमांक- निवडणूक आचारसंहिता/२०२४/विशि-१/४९२५ दि.५ नोव्हेंबर, २०२४

**परिपत्रक-**

**वाचा** १.मा.निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे आचारसंहिता पालनाबाबतचे निर्देश
२..महाराष्ट्र नागरी सेवा(वर्तणूक) नियम १९७९
३..महाराष्ट्र अकृषी विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये प्रमाणसंहिता(शिक्षकेत्तर पदांच्या अटी व सेवाशर्ती) नियम १९८४

सध्या राज्यामध्ये महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. या आचारसंहितेमध्ये मा.निवडणूक आयोग यांचेकडून आचारसंहिता नियमाचे पालन करण्याबाबतचे विविध प्रकारचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

मा.निवडणूक आयोग यांचे आचारसंहिता पालनासंदर्भातील निर्देश, त्याचप्रमाणे शासन निर्णय दि.२० मे, २०१० अन्वये राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी सामाईक परिनियम (Common Statutes) अस्तित्वात येईपर्यंत महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतूदी लागू करण्यात आलेल्या आहेत. करिता, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ५(१) मध्ये नमूद केल्यानुसार, कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याला कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा राजकारणात भाग घेणाऱ्या कोणत्याही संघटनेचा सदस्य होता येणार नाही. किंवा त्याचेशी अन्यथा संबंध ठेवता येणार नाही किंवा कोणत्याही राजकीय चळवळीत किंवा कार्यात कोणत्याही प्रकारे भाग घेता येणार नाही किंवा सहाय्य करता येणार नाही. तसेच ५(४) नुसार तो कर्मचारी कोणत्याही विधानसभेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या निवडणूकीत प्रचार करू शकणार नाही किंवा अन्यथा हस्तक्षेप करू शकणार नाही किंवा त्यासंबंधी आपले वजन खर्च करू शकणार नाही किंवा त्यात भाग घेऊ शकणार नाही, याकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

सबब, राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी राजकीय पक्षांच्या निवडणूक प्रचार कामात प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष सहभाग घेतल्यास त्यांचेविरूद्ध विद्यापीठे व संबंधित संस्थांनी शिस्तभंगविषयक कठोर कारवाई करावी.

या अनुषंगाने सदर परिपत्रक आपले अधिनस्त सर्व विद्यापीठीय व महाविद्यालयीन अधिकारी व कर्मचारी यांचे निदर्शनास आणण्यात यावे.

तसेच मतदानाचा टक्का वाढावा यासाठी आपल्या अधिनस्त महाविद्यालयातील पात्र विद्यार्थी, विद्यार्थीनी यांना मतदान करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहित करावे.

(डॉ.शैलेन्द्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक ( उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६.

प्रति,

१.कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे ,
२.सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

प्रत- मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२